## वार्षिक निकाय सभेचें निमंत्रण

चालू वर्षाची म्हणजे १८ व्या वर्षाची निकाय सभा ( वार्षिक साधारण सभा ) रविवार दि० २२ आक्टोबर १९६१ ला, सायंकाळीं ४॥ वाजतां महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयाच्या सभागृहांत ( कॉमन्वेल्थ बिल्डिंग, लक्ष्मी पथ येथें ) भरेल. त्या वेळीं पुढील क्रमणिकेंत दिलेलें कामकाज होईल. तरी सर्व सभासदांनीं या वेळीं अवश्य उपस्थित राहावें ही विनंति.

### क्रमणिका

( १ ) दिवंगत सभासदांविषयीं दुखवटा.

( २ ) गतवर्षाच्या ( १९६०–६१ ) निकाय सभेच्या इतिवृत्तास मान्यता.

( ३ ) गतवर्षाच्या कार्याचें निवेदन.

( ४ ) गतवर्षाच्या समाव्ययास ( ताळेबंदास ) मान्यता.

( ५ ) नवीन वर्षाकरितां ( १९६१–६२ ) पदाधिकाऱ्यांची निवड.

( ६ ) या वर्षी संस्थेनें हातीं घ्यावयाचीं कामें व त्या संबंधानें आलेल्या सूचनांचा विचार.

( ७ ) १९६१–६२ च्या अर्थसंकल्पाच्या आराखड्यावर चर्चा.

( ८ ) आयत्या वेळचे विषय. ( अध्यक्षांच्या अनुमतीनें ).

( ९ ) प्राध्यक्षांचें भाषण.

( १० ) आभार.

पुणें; दिनांक ७ आक्टोबर १९६१

आपले,

मो. ना. गोखले

स. ग. काजरेकर

टीप— सभासदांना कांहीं प्रश्न विचारावयाचे असतील अगर सूचना करावयाच्या असतील, अथवा प्रशासक मंडळावर निवड करण्याकरितां नांवें सुचवावयाचीं असतील तर त्यांनीं सभेपूर्वी निदान ३ दिवस अगोदर कार्यवाह यांच्याकडे तसें लेखी कळवावें.

सभेस अगत्यपूर्वक उपस्थित राहावें.

कार्यवाह

Pratibha Mudranalaya, Poona 2.

“ ज्ञानस्य निर्मलं नेत्रं ज्योतिष्यकमनुत्तमम् ”

# ज्योतिर्विद्या परिसंस्था, पुणें २.

स्थापना १९४४

ज्योतिर्विद्या परिसंस्था पुणे

JYOTIRVIDYA PARISANSTHA POONA 2

सन १९६०–६१ * वर्ष १७ वें

## वार्षिक-वृत्तान्त व समाव्यय ( ताळेबंद )

[ पुढील वर्षाच्या अर्थ-संकल्पासह ]

प्रकाशक

मो. ना. गोखले, B. Sc.

स. ग. काजरेकर, B. Sc.

कार्यवाह

# ज्योतिर्विद्या परिसंस्था, पुणें

" ज्ञानस्य निर्मलं नेत्रं ज्योतिष्यकमनुत्तमम् "

[ स्थापना : श्री गणेशचतुर्थी, शके १८६६ दि. २२-८-१९४४ ]

## सन १९६०–६१ चा ( १७ व्या वर्षाचा ) वार्षिक वृत्तान्त

**प्रिय सदस्य व संस्थेचे हितचिंतक,**

दि. ३० जून १९६१ ला संपणाऱ्या संस्थेच्या १७ व्या वर्षाचा हा वार्षिक वृत्तान्त व ताळेबंद आवश्यक त्या पत्रकांसह आपणांपुढें सादर करण्यास आम्हांस आनंद वाटतो. संस्था आतां १८ व्या वर्षांत पदार्पण करीत आहे ही आपणा सर्वांच्या समाधानाची गोष्ट आहे.

जोतिष्यकीय ज्ञानाच्या प्रसाराच्या दृष्टीनें प्रतिवर्षाप्रमाणें वृत्तान्त-वर्षींहि कांहीं विशेष उपक्रम सुरूं करून संस्थेनें आपलें पाऊल प्रगतिपथावरच ठेवलें आहे.

**प्रशासक-मण्डळ** [ Governing Council ] वर्षारंभीच्या साधारण सभेनें वृत्तान्त वर्षाकरितां ( सन १९६०–६१ ) प्रशासक-मण्डळावर खालील सदस्यांची निवड केली होती :—

**प्राध्यक्ष**– प्रा. डी. डी. कापडिया, M. A., B. Sc., I. E. S. Retd.

**अध्यक्ष**– प्रि. गो. रा. परांजपे, M. Sc., F. N. I., O. B. E.

**उपाध्यक्ष**– डॉ. मो. बा. चिपळूणकर, M. Sc., D. Sc.
Prof. of Physics & Head of Physics Dept. Poona Uni.

नैधिकः–प्रा. स. वि. आपटे, M. A., B. Sc., B. E. S. Retd.

कार्यवाहः– ( १ ) श्री. मो. ना. गोखले, B. Sc.

( २ ) श्री. स. ग. काजरेकर, B. Sc.

सदस्यः– ( १ ) प्रा. मो. ल. चन्द्रात्रेय, M. A., B. E. S. Retd.

( २ ) डॉ. दि. न. मोघे, M. Sc., D. Sc.

( ३ ) प्रा. ना. म. आठवले, M. A.

( ४ ) श्री. शं. ना. हरीप, सेवानिवृत्त हेड्क्लार्क, पब्लिक हेल्थ सर्कल,

( ५ ) प्रा. द. श्री. जोग, M. Sc.

( ६ ) पं. वि. घों. गोरेशास्त्री,

( ७ ) श्री. द. गो. फडके, B. A., LL. B.

( ८ ) प्रा. ज. ब. कुमठेकर, M. A., B. Sc., B. T.

( ९ ) श्री. श्री. भा. वेदपाठक, B. Sc., B. T.

( १० ) श्री. वि. वि. मोडक, G. D. C., G. C. C.

( ११ ) श्री. माधवराव भवानराव पंत. B. Sc., B. T.

अधीक्षक ( समान्वय निरीक्षक ) श्री. ल. के. तांबे, हेडक्लार्क व अकौंटन्ट, न्यू. इं. स्कूल, टिळक पथ, पुणें.

**तद्विद्य मंडळ [ Academic Council ]**

( १ ) प्रि. गो. रा. परांजपे

( २ ) डॉ. मो. वा. चिपळूणकर

( ३ ) प्रा. मो. ल. चंद्रात्रेय

( ४ ) प्रा. स. वि. आपटे

( ५ ) प्रा. ना. म. आठवले

( ६ ) डॉ. दि. न. मोघे

( ७ ) प्रा. द. श्री. जोग

( ८ ) प्रा. ज. ब. कुमठेकर

**वृत्तान्तवर्षांतील सभा**



कार्यक्रमाच्या रूपरेषेसंबंधीं चर्चा हीं मुख्य कामें झालीं. ज्योतिष्यकाच्या प्रगत अभ्यासासाठीं एक अभ्यासमंडळ यंदा चालू करावें असेंहि सभेनें ठरविलें ॐ दिनांक २३-१०-६० व दिनांक २२--२-६१ या दिवशींच्या दोन सभा ( २ री व ४ थी ) प्रा. ना. म. आठवले यांच्या निमंत्रणावरून त्यांच्या वेधशाळेंतच भरल्या होत्या. त्या वेळीं प्रशासक मंडळाच्या सदस्यांनीं वेधशाळेंतील दूरादर्श, वर्णादर्श इत्यादि उपकरणांची निर्मिति व त्यांचा वापर, यासंबंधीं सप्रात्यक्षिक चर्चा केली. ॐ दिनांक ८-१०-६१ च्या तिसऱ्या सभेमध्यें प्रामुख्यानें श्री. हरीप यांना द्यावयाच्या मानधनाच्या विषयावर चर्चा होऊन ठराव झाला. त्याची माहिती वृत्तांतात पुढें दिली आहे. संस्थेच्या संकल्पित प्रकाशनांविषयींहि या सभेंत विचारप्रदर्शन झालें.

[ आ ] तद्विद्य मंडळाच्या अेकूण तीन सभा झाल्या. दिनांक ३०–१०–६० व ७–११–६० ला झालेल्या पहिल्या दोन सभांमध्यें सरकारी राष्ट्रीय पंचांगावर चर्चा झाली व या विषयासंबंधीं अन्य तज्ञ मंडळींना निमंत्रण देऊन एक प्रकट परिसंवाद घडवून आणण्याचें ठरलें. त्या प्रमाणें झालेल्या कार्यक्रमाचा ( तद्विद्य मंडळाची तिसरी सभा ) उल्लेख पुढें आलेला आहे.

**स्फुट व्याख्यानें व लेख**

[ अ ] परिसंस्था करीत असलेल्या ज्ञानप्रसाराचें महत्त्वाचें उपांग म्हणजे स्फुट व्याख्यानें. वृत्तान्तवर्षीं पुढील दोन व्याख्यानें झालीं.

| विषय | दिनांक | व्याख्याते |
|---|---|---|
| ॐ मी युरोपांत पाहिलेल्या कांहीं वेधशाळा | २६-२-६१ | डॉ. मो. वा. चिपळूणकर |
| ॐ भारतीय वेधपद्धति व वेधसाधनें | ४-६-६१ | प्रा. ल. वा. गुर्जर |

[ आ ] याशिवाय परिसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांनीं ज्योतिःशास्त्राशीं संबंधित विषयांवर अन्य संस्थांच्या वतीनें पुढील व्याख्यानें दिलीं–

| वक्ते | संस्था | विषय |
|---|---|---|
| ॐ डॉ. मो. वा. चिपळूणकर | वसंतव्याख्यानमाला, पुणें. | विश्वकल्पना |
| ॐ प्रि. गो. रा. परांजपे | वासंतिक शास्त्रीय व्याख्यान | प्रकाश आणि तरंग |

संस्थेचे एक हितचिंतक श्री. वि. वि. गोखले, M. Sc., I. A. S. यांनीं ज्योतिष्यकविषयक एक आकर्षक लेख किर्लोस्कर मासिकामध्यें (नोव्हेंबर १९६०) प्रसिद्ध केला; त्या लेखांत आपली संस्था करीत असलेल्या कार्यांचा गौरवपूर्वक उल्लेख त्यांनीं केला आहे. या लेखाच्या अनुषंगानें संस्थेच्या कार्यासंबंधीं व प्रकाशनांसंबंधीं विचारणा करणारीं अनेक पत्रें परिसंस्थेकडे आलीं होती. पृच्छकांना आवश्यक ती माहिती अर्थातच पुरविली गेली.

**प्रकट परिसंवाद:—** भारत सरकार प्रसिद्ध करीत असलेल्या पंचांगासंबंधीं प्रकट चर्चेचा एक कार्यक्रम दि. १३-११-६० ला घडवून आणला होता. सभेंत बहुविध चर्चा झाली, परंतु निश्चित निर्णय झाले नाहींत.

**आकाश निदर्शनें—**दि. १४ फेब्रवारी १९६१ ला रात्रीं ९ ते ११ व दि. १५ फेब्रवारी १९६१ ला पहाटे ४॥ ते ६॥ अशा दोन वेळीं आकाश-निदर्शनाचे कार्यक्रम, जनतेसाठीं, पूर्वप्रसिद्धीसह घडवून आणले. त्या वेळीं दूरादर्शांचेंहि साह्य घेण्यांत आलें होतें व गुरूचे चंद्र, शनीचीं वलयें, गुरु-शनि युति आणि दक्षिण आकाशांतील कांहीं अभ्रिका इ. दाखविण्यांत आलें.

याशिवाय, परगांवाहून येथें आलेल्या जिज्ञासू व्यक्तींसाठीं आकाश-निदर्शनाचे दोन विशेष कार्यक्रम मे महिन्यांत केले होते.

**अभ्यासमंडळ:—** ज्योतिष्यकाच्या प्रगत अभ्यासासाठीं अभ्यास-मंडळाची स्थापना हा या वर्षींचा विशेष उल्लेखनीय उपक्रम आहे. अभ्यास-मंडळ स्थापन करण्यासंबंधीं या वर्षाच्या सुरूवातीस केलेला संकल्प कृतींत आणून मंडळाचें कार्य आपण चिकाटीनें चालूं ठेवलें आहे.

या वर्षीं अभ्यासमंडळाच्या एकूण १९ बैठकी झाल्या. पहिल्या ७ बैठकींमध्यें प्रा. मो. ल. चंद्रात्रेय यांनीं गोलीय त्रिकोणमिति ( Spherical Trigonometry ) व गणित ज्योतिष्यकीय पद्धति ( Mathematical Astronomy ) या विषयांचें विवरण केलें. नंतरच्या ६ बैठकींमध्यें प्रा. द. श्री. जोग यांनीं 'वर्णावली' ( Spectroscopy ) संबंधीं संपूर्ण तात्विक विवेचन केलें. त्यानंतर श्री. मा. भ. पंत यांनीं 'ज्योतिर्यामिका' संबंधीं ( Celestial Mechanics ) विवेचन सुरूं केलें आहे.

अभ्यासमंडळाच्या बैठकी सर्वांच्या सोयीसाठीं रविवारीं सकाळीं ९ ते



नेहमींच साह्यभूत झालें, हें येथें उल्लेखिलें पाहिजे. आगामी वर्षींहि या मंडळाचें कार्य अधिक जोमानें चालूं राहील व अन्य जिज्ञासू मंडळीं अधिक संख्येनें यांत भाग घेतील अशी आशा आहे.

**संस्थेस मिळालेल्या देणग्या—**या वर्षीं संस्थेस खालील देणग्या मिळाल्या.—

( १ ) पुणें महानगरपालिका, — रु. १००|–

( २ ) सरकारी ग्रँट — रु. १७२|–

( मेहेरबान डायरेक्टर ऑफ एज्युकेशन यांच्याकडून. ) या ग्रँटचा उल्लेख संस्थेच्या १९५९–६० च्या अहवालांत आलेला आहे.

( ३ ) 'क्ष' — रु. २५|–

(प्रा. द. श्री. जोग यांचें हस्तें.) ही देणगी, संस्थेच्या सार्वजनिक कार्यामध्यें भाग घेणाऱ्या व आर्थिक मदतीची आवश्यकता असणाऱ्या व्यक्तीसच देण्या-साठीं मिळालेली आहे.

( ४ ) श्री. अजित त्र्यंबक ढवळे यांजकडून — रु. २५|–
( कै. त्र्यं. गो. ढवळे यांच्या वर्षश्राद्धानिमित्त )

**ग्रंथसंग्रहांत भर—** या वर्षीं संस्थेच्या ग्रंथसंग्रहांत पुढील ग्रंथांची भर घातली आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | The Birth and Death of the Sun | George Gamow |
| 2. | One, Two, Three……Infinity | ,, ,, |
| 3. | The Face of the Sun. | H. W. Newton |
| 4. | Celestial Mechanics | Y. Ryabov |
| 5. | अहवाल–सरकारी भाषा मंडळ ( १९५६ ) | |
| 6. | Astronomy made Simple | Meir H. Degani |
| 7. | Radio Astronomy | F. Graham Smith. |
| 8. | Astro–Physics | Pelloth |
| 9. | The Sky–Observer's Guide | Newton Mayall & Margaret Mayall |

पुणें विद्यापीठाच्या ग्रंथालयातील ज्योतिष्यक विषयावरील ग्रंथांची यादी डॉ. मो. वा. चिपळूणकर यांच्या सौजन्यानें संस्थेकडे आलेली आहे.

**प्रकाशनांची विक्री**— संस्थेच्या प्रकाशनांना या वर्षीं चांगली मागणी येत गेली हें विदित करण्यास आम्हांस आनंद वाटतो. या वर्षाचा खप, गेल्या वर्षाच्या खपाच्या सुमारे दुप्पट आहे.

**नवीन सदस्य**—या वर्षीं खालील सद्गृहस्थ संस्थेचे सदस्य झाले आहेत—

१ श्री. दत्तात्रेय विनायक गोडसे, संचालक उद्यम इंजि० वर्क्स.

२ प्रा. रामचंद्र भालचंद्र गुते, M. Sc.

३ प्रा. रामचंद्र तुकाराम कुलकर्णी, M. Sc.

४ श्री. नारायण श्रीपाद लिमये M. Sc.

५ श्री. अजित त्र्यंबक ढवळे M. Sc.

६ श्री. ए. बी. रामचंद्रराव, B. Sc. ( Hon० )

**मानधन**— परिसंस्थेच्या संस्थापकांपैकीं एक ज्येष्ठ व कळकळीचे कार्यकर्ते श्री. बापूसाहेब हरीप हे पक्षघातानें आजारी असल्यामुळें, संस्थेच्या दैनंदिन कामामध्यें यापूर्वी त्यांची जी बहुमोल मदत मिळत असे तिची उणीव वारंवार जाणवते. त्यांनीं आतापर्यंत संस्थेची जी बहुमोल सेवा केली ती विचारांत घेऊन व त्यांच्या असहाय परिस्थितींत अल्पशी मदत म्हणून संस्थेनें वृत्तान्त वर्षी रु. ३००|– चें मानधन त्यांना दिलें आहे.

**चिरवियोग**— संस्थेचे एक हितचिंतक व आजीव सभासद श्री. नागेश केशव जोग आणि सदस्यांपैकीं प्रा. प. म. लिमये, श्री. एस्. जी. दामले व श्री. ह. वा. कटककर ही मंडळी या वर्षीं निधन पावलीं याचा उल्लेख करण्यास आम्हांस फार खेद होतो. अशी कळकळीची मंडळी आपल्यांतून गेल्यानें संस्थेची हानी झाली आहे.

**आर्थिक**— परिसंस्थेची आर्थिक बाजू व नवीन वर्षाच्या निकल्पाचा आराखडा दाखविणारीं पुढील पत्रकें सोबत दिलीं आहेत :

पत्रक क्र. १ Receipts and Payments A/c, for the year



पत्रक क्र. ३ Balance Sheet as at 30 the June 1961.

,, ,, ४ १९६१–६२ चा निकल्प ( अर्थसंकल्प )

**आभार**— वरीलप्रमाणें परिसंस्थेच्या १७ व्या वर्षांतील कार्याचा अहवाल त्रोटक स्वरूपांत आपल्यापुढें ठेवला आहे; त्यावरून संस्थेची वाढती प्रगति आपल्या नजरेस येईल. संस्थेला हें श्रेय प्राप्त करून देण्यास संस्थेचें सर्व सदस्य व विज्ञानप्रेमी जनता कारणीभूत आहे. संस्थेच्या सभा-व्याख्यानांना महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयाचें सभागृह नेहमींच मिळत आलेलें आहे. तसेंच आकाशनिदर्शनासाठीं लक्ष्मण भुवन व भारत इतिहास संशोधक मंडळ या संस्थांनीं आपल्या सौधांचा उपयोग करूं दिला होता. या व अन्य अनेक संस्था व व्यक्ति यांचें आम्हांस साह्य झालें. त्या सर्वांचे हार्दिक आभार मानून हें निवेदन आम्ही संपवितों.

आपले,

स. वि. आपटे,
नैधिक

मो. ना. गोखले
स. ग. काजरेकर
कार्यवाह

पुणें, दि. १२-८-६१

## JYOTIRVIDYA PARISANSTHA

### Receipts & Payments A/c for the year ending 30-6-61

| Receipts S. N. A/c Head | Rs. nP. | Payments S. N. A/c Head | Rs. nP. |
|---|---|---|---|
| 1. Subscription a/c | 283-00 | 1. Salary a/c | 179-00 |
| 2. Petty Donations a/c | 30-00 | 2. Printing of Books a/c | |
| 3. Grants & Donations a/c | | (i) Printing Charges 322-90 | |
| Grants 272-00 | | (ii) Mics Exps. on Publications 14-00 | 336-90 |
| Donations 50-00 | 322-00 | 3. Library a/c | 62-16 |
| 4. Sale of books a/c | | 4. Lactures—Exps. on conveyance | 7-09 |
| (i) Tarakanagari 60-00 | | 5. Stationary & Printing a/c | 49-93 |
| (ii) Suryakul 25-00 | | 6. Misc. Ex-penses a/c | 21-56 |
| (iii) Chandraprabha 40-00 | | 7. Contingent Expenses a/c | 131-50 |
| (iv) Tarachitrak 135-00 | | 8. Commission on sale of | |
| (v) Vedha-Sadhane & Vedha-Shala 35-75 | | | |
| (vi) Sandnyavali 00-50 | | | |
| (vii) Vishwachi Rachana & Utkranti 00-75 | | | |
| (viii) Miscellaneous | | | |



| Receipts S.N. A/c Head | Rs. nP. | Payments S.N. A/c Head | Rs. nP- |
|---|---|---|---|
| 5. Advances a/c | 70-50 | 10. Equipment a/c | 11-03 |
| 6. Interest a/c | 107-99 | 11. Furniture a/c | 60-00 |
| Opening Balance as on 1-7-60 | | 12. Honorarium a/c | 300-00 |
| Cash in hand 3-20 | | 13. Advances a/c (as per contra) | 70-50 |
| Cash in Bank 5,468-70 | 5,471-90 | 14. Postage a/c | 10-37 |
| | | Closing Balance as on 30-6-61 | |
| | | Cash in hand 115-96 | |
| | | Cash in Bank 5,171-77 | 5,287-73 |
| | 6,583-01 | | 6,583-01 |

शेरा : ज्योतिर्विद्या परिसंस्था, पुणें, या संस्थेचे जमाखर्च–रोजकीर्द–खतावणी–जमेची पावती बुकें, खर्चाचीं व्हाउचर्स, जावक टपालनोंदणी पुस्तक, बँकेचें पासबुक यांच्या आधारें तपासून पहातां सदर संस्थेचा सन १९६०–६१ चा वरील जमाखर्चाचा ताळेबंद बरोबर आहे. त्यांत कोणत्याही प्रकारची चूक आढळून आली नाहीं.

सही–ल. के. तांबे
अधीक्षक
ज्योतिर्विद्या परिसंस्था, पुणें २

पुणें, दि. १६ सप्टेंबर, १९६१

## जी. डी. आपटे आणि कंपनी, चार्टर्ड अकौन्टन्ट्स्, पुणें २ यांचे शेरे

With the Asstt. Charity Commissioner, Poona

In the matter of Act XXIX of 1950

and

In the matter of

**JYOTIRVIDYA PARISANTHA**

Poona, Public Trust

Public Trust No. F-44

Audit for the year ending 30th June 1961

We the undersigned Auditors, hereby report that :

( a ) The accounts are maintained regularly and in accordance with the provisions of the act and the Rules ;

( b ) The receipts and disbursements are properly and correctly shown in the accounts ;

( c ) The cash balance and vouchers in the custody of the manager or trustee on the date of audit were in agreement with the accounts ;

( d ) The books, deeds, accounts, vouchers or other documents or records required by us were produced before us ;

( h ) The amounts of outstandings for more than one year are Rs- Nil and the amounts written off are Rs. Nil-

( i ) Not applicable

( l ) Donations in kind are not accounted for.

G. D. Apte & Co.
Chartered Accountants
5—4—3

Phone : 7872
United Western Bank Buildin2
Laxmi Road, Poona 2.
Date 26 th Sept., 1961

**Schedule IX**

vide Rule 17 (i) Registered No. F-44

Name of the Public Trust—**Jotirvidya Parisanstha Poona.**

Income & Expenpiture A/C for the year ending 30th June 1961.

| Expenditure | | Rs. nP. | Income | | Rs. nP. |
|---|---|---|---|---|---|
| To Establishment Expenses | | | By Interest on Bank accounts | | 107-99 |
| Advertisement | 9-75 | | By Donations in cash or kind | | 80-00 |
| Salary | 179-00 | | By Subscriptions | | 283-00 |
| Printing | 14-00 | | By Grants | | |
| Postage | 10-37 | | Director of Education Maharashtra State | 172-00 | |
| Honoraium | 300-00 | | Poona Municipal Corporation | 100-00 | 272-00 |
| Stationery | 49-93 | | By Sale Books | | 297-62 |
| Contingent | 131-50 | 694-55 | | | |
| To Miscellaneous Expenses | | 24-56 | | | |
| To Educational Expenditure On the Object of the Trust | | | | | |
| Cost of books Sold | 131-24 | | | | |
| Lectures | 7-09 | | | | |
| Commission on Sale of books | 42-49 | 180-82 | | | |
| To Surplus carried over to Balance Sheet | | 140-68 | | | |
| Total Rs. | | 1,040-61 | Total Rs. | | 1,040-61 |

As per report of even date
sd/- G. D. Apte & Co.



**Schedule VIII**

vide Rule 17 (i)

Name of the Public Trust **Jyotirvidya Parisanstha, Poona.**

BALANCE SHEET as at 30th June 1961.

| FUNDS & LIABILITIES | | | ASSETS | | |
|---|---|---|---|---|---|
| Trust Fund or Corpus As per last B/S. | | 1,983-25 | Immovable Properties : | | |
| Income & Expenditure A/C as per last B/S | 6,832-28 | | **Investments** 3½% Treasury Savings Dep. Certificates | | 500-00 |
| Add Surplus as per I/E A/C | 140-68 | 6,972-96 | **Library Books** As per last B/S | 183-54 | |
| | | | Additions during the year | 62-16 | 245-70 |
| | | | **Furniture and Fixture** As per last B/S | 191-34 | |
| | | | Additions during the year | 71-03 | 262-37 |
| | | | **Stock of Publications (Books)** | | 2,660-41 |
| | | | **Cash and Bank Balance** (a) Cosmos Coop. Urban Bank Ltd., in S/B A/C | | 5,171-77 |
| | | | (c) With the Secretary | | 115-96 |
| Total Rs. | | 8,956-21 | Total Rs. | | 8,956-21 |

The above Balance Sheet to the best of our belif contains a true account of the Funds and liabilities and the property and Assets of trust.

Dated at Poona 30-9-61 As per our report of even Date

## १९६१–६२ सालचा निकल्प ( अर्थसंकल्प )

**जमा**

| मागील वर्षाची १९६१-६२ ची खातें | प्रत्यक्ष रु. न. पै. | संकलिपत रु. न. पै. |
|---|---|---|
| वर्गणी | २८३–०० | ३००–०० |
| अल्प देणगीदार | ३०–०० | २५–०० |
| देणग्या | ५०–०० | |
| सरकारी ग्रॅन्ट | १७२–०० | |
| महानगर पालिका | १००–०० | ३००–०० |
| पुस्तकविक्री | २९७–६२ | २५०–०० |
| व्याज | १०७–९९ | ७५–०० |
| व्याख्यानमाला– सिनेमा शो | | २००–०० |
| | | ११५०–०० |
| अपेक्षित तूट ❀ | | ७९६०–६० |
| अेकूण | | ९११०–०० |

**खर्च**

| मागील वर्षाचा १९६१–६२ चा खातें | प्रत्यक्ष रु. न. पै. | संकलिपत रु. न. पै. |
|---|---|---|
| पगार | १७९–०० | १८०–०० |
| पुस्तक- छपाई | ३३६–९० | २,५००–०० |
| ग्रन्थसंग्रह | ६२–१६ | ६०–०० |
| साहित्य- संभार | ११–०३ | ५,०००–०० |
| व्याख्यानें– प्रचार इ० | ५९–३३ | ६०–०० |
| स्टेशनरी | ४९–९३ | |
| पोस्टेज | १०–३७ | |
| छपाई ( अहवाल इ. ) | १३१–१५ | |
| बँक कमिशन– रेव्हेन्यू स्टँप इ. | ०–३५ | ३५०–०० |
| किरकोळ | २४–५६ | ६०–०० |
| फर्नीचर | ६०–०० | १००–०० |
| मानधन | ३००–०० | — |
| जागा भाडें | — | ६००–०० |
| व्याख्यानमाला– सिनेमा शो | — | २००–०० |
| अेकूण रु. | | ९११०–०० |

❀ निकल्प तुटीचा झाला आहे. यांत प्रकाशन छपाईचे रु. २,५०० आणि साहित्यसंभार खरेदी यासाठीं रु. ५,००० असें एकूण रु. ७,५०० सरकारकडून अनुदान म्हणून अपेक्षित धरलें आहेत.

स. वि. आपटे
नैधिक

मो. ना. गोखले
स. ग. काजरेकर
कार्यवाह

## ज्योतिर्विद्या परिसंस्थेचीं प्रकाशनें

### उपयुक्त व संग्राह्य

( १ ) सूर्यकुल–( संग्राहक: प्रा. मो. ल. चंद्रात्रेय व कै. त्र्यं. गो. ढवळे ) सूर्यकुलामधील निरनिराळे ग्रह व उपग्रह, उल्का, लघुग्रह, धूमकेतु, इ. संबंधानें ज्ञानसंवर्धक, अद्ययावत् व उपयुक्त माहिती. सुबोध भाषा व विद्वानांनीं एकमुखानें वाखाणलेलें व डेक्कन व्हर्नाक्युलर सोसायटीनें पारितोषिक देऊन गौरविलेलें. पृष्ठ संख्या २८०, किंमत रु. ५.

( २ ) तारकानगरी–तारकांनीं व्यापिलेल्या एकंदर विश्वाविषयीं उद्बोधक माहिती, तारकादिकांची ओळख, आकाशगंगेचें स्वरूप, दूर अंतरावरच्या ताऱ्यांची माहिती कशी मिळविली जाते, ताऱ्यांच्या गती कशा काढतात, अंतराळांतल्या अनेक विश्वांचें स्वरूप इ. उपयुक्त व मनोरंजक माहिती. याही प्रकाशनाला डे. व्ह. ट्रान्स्लेशन सोसायटीनें पारितोषिक देऊन गौरविलें आहे व विद्वानांनीं प्रशंसिलें आहे. पृष्ठसंख्या १६५, किंमत ३ रु.

( ३ ) ताराचित्रक संच– ( आवृत्ती दुसरी, दोन रंगांत छपाई ) ठळक ठळक ताऱ्यांची ओळख करून देणारे, आकाशाच्या देखाव्यावरून तारीख व वेळ सांगणारे तसेंच तारीख वेळेवरून आकाशाचें कोणतें दृश्य दिसूं शकेल त्यांचा बोध करणारे दोन मोठे नकाशे. आकार: अनुक्रमें ४०×३० व २७×२२॥ इंच. सोबत खुलासा देणारी विवरण पुस्तिकाही मिळते. सर्व संचाची किंमत १:५० न. पै.

( ४ ) वेधसाधनें व वेधशाळा– प्राचीन काळापासून वेध घेण्याचीं साधनें कोणतीं होतीं, त्यांची वाढ व परिणति पुढें कशी झाली, त्यांची रचना, वेधशाळांचें सामान्य स्वरूप व तेथील कार्य व संग्रह ज्योतिष्यकाची :( Radio Astronomy ) ओळख या ग्रंथांत सुबोध रीतीनें मांडली आहे. किंमत २–७५ न. पै व पोस्टेज १ रु.

(५) चंद्रप्रभा– चंद्राचे वाङ्मयांतील उल्लेख. चंद्रामुळें पंचांग कसें बनतें, चंद्रावर वसाहत करणें कितपत शक्य आहे, चंद्राचीं ग्रहणें, भरती ओहोटी वगैरे संबंधानें खुलासा व चटकदार वर्णन. डे. व्हर्ना. ट्रान्स्लेशन सोसायटीनें पारितोषिक देऊन गौरविलेलें पुस्तक. पृष्ठसंख्या १३०, किंमत रु. २-५० न. पै.

(६) विश्वाची रचना व उत्क्रांति– (ले. कै. त्र्यं. गो. ढवळे) सबंध विश्वाची घडण क्रमशः कशी होत गेली अभिका; दीर्घिका; काय आहेत व या विश्वाची उत्क्रांती कशी होत आहे यासंबंधीं सोपपत्तिक माहिती. पृष्ठें ४५, किंमत ७५ न. पैसे

(७) संज्ञावली– ज्योतिष्यकाच्या पारिभाषिक शब्दांचे अर्थ व विवरण पृष्ठें: २३, किंमत रु. ०·२५ न. पैसे

(८) छोट्या पुस्तिका व प्रकाशन निबंध– (१) कालमापन व त्याचीं साधनें (ले. कै. त्र्यं. गो. ढवळे) काल म्हणजे काय, त्याचें मापन, साधनें, इ. खुलासा. (२) पाश्चात्य ज्योतिष्यकाचा वैचारिक इतिहास– (ले. कै. त्र्यं. गो. ढवळे) खिस्तपूर्व दीडहजार वर्षांपासूनच्या पाश्चात्य शास्त्रज्ञांच्या कल्पना व बदल याची माहिती. (३) सूर्याचें अंतरंग (लेखक: प्रा. दा. गो. ढवळे) सूर्याच्या अंतरंगासंबंधानें माहिती. (४) सूर्यदेवता– (लेखक: प्रा. मो. ल. चंद्रात्रेय) सूर्यासंबंधानें वाङ्मयांतले कांहीं उल्लेख (५) आर्यांच्या मूळ वसतिस्थानासंबंधीं झालेल्या व्याख्यान मालेंतील मुद्यांचे टांचण वरील सर्व छोट्या पुस्तिकांची किं. प्रत्येकी रु. ०·१२ न. पैसे.

टीप— १. प्रकाशनें व्ही. पी. नें पाठविली जात नाहींत. २. टपाल हशिलासह पुस्तकांची किंमत मॅनिऑर्डरनें पाठवावी. ३. सर्व प्रकाशनें शाळा-कॉलेजांना व ग्रंथसंग्रहालयाकरितां उपयुक्त आहेत.

मागणी— श्री. मो. ना. गोखले, कार्यवाह, ज्योतिर्विद्या परिसंस्था, चंद्रकिरण, ११९५, सदाशिव, पुणें २. या पत्त्यावर करावी.